# आकाशवाणी पुणे
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

**दिनांक – २८/०६/२०२५** **वार – शनिवार**

**धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान**

आदिवासी जमातीच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाकरीता प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान पुणे जिल्ह्यात प्रभावीपणे राबवून पुणे जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आणण्याकरीता प्रयत्न करण्याच्या सूचना आदिवासी विकास विभागाचे मंत्री अशोक वुईके यांनी आज पुण्यात दिल्या. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी महान्याय अभियान आणि प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाअंतर्गत ३१ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचं वाटप करण्यात आलं आहे. वुईके यांच्या हस्ते जिल्ह्यातील विविध योजनांच्या लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात धनादेश वाटप, कातकरी लाभार्थ्यांना घरकुलांकरीता वनहक्क दावा बहाल करण्यात आले.

आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यातील आदिवासी शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी, निदान, प्रतिबंधात्मक उपचाराकरीता एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव आणि के.ई.एम. रुग्णालय संशोधन केंद्र पुणे यांच्या दरम्यान सामंजस्य करारही यावेळी करण्यात आला.

**पेरणी**

पुणे जिल्ह्यात खरीप हंगाम २०२४-२५ साठी पेरणीला चांगला वेग आला आहे. जिल्ह्यातील दोन लाख दोन हजार हेक्टरपैकी ५५ हजार हेक्टर म्हणजे २७ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. जिल्ह्यातील १३ तालुक्यांपैकी पुरंदर, शिरूर, आणि जुन्नर या तालुक्यांमध्ये पेरणीनं आघाडी घेतली आहे. दुसरीकडे, मुळशी, वेल्हा आणि हवेली या तालुक्यांमध्ये पेरणीचं प्रमाण कमी आहे. जिल्ह्यात सरासरी ६५० ते ७०० मिलिमीटर पाऊस पडतो, जो खरीप पिकांसाठी अनुकूल आहे, असं पुणे जिल्हा कृषी विभागानं म्हटलं आहे.

**भाषा**

पिंपरी चिंचवड महापालिकेनं सन २०२२ मध्ये इयत्ता पहिली आणि दुसरीच्या वर्गापासून सुरू केलेल्या ईएसएल म्हणजे इंग्लिश ऍंज सेकंड लँग्वेज उपक्रमामुळं शाळांमध्ये सकारात्मक बदल घडतो आहे. या उपक्रमाअंतर्गत सुमारे २०० प्राथमिक शिक्षकांना मासिक कार्यशाळांमधून प्रशिक्षण देण्यात आलं. महापालिका शाळांमधील शिक्षकांच्या अभिप्रायावरून १० शिक्षकांनी मिळून ३०० पानी इंग्रजी सराव पुस्तक तयार केलं आहे. ते तीन टप्प्यांमध्ये विभागलेलं असून त्यामध्ये अक्षर ओळख, शब्द वाचन, वाक्य वाचन ते परिच्छेद वाचनापर्यंतचा समावेश करण्यात आला आहे. ही पुस्तकं अध्यापन आणि मूल्यमापन अशा दोन्ही गोष्टींसाठी वापरली जात आहेत.

उपक्रमाच्या यशामुळं आता इयत्ता तिसरी, चौथी आणि पाचवीमध्येही त्याचा विस्तार करण्यात आला आहे. नवीन सराव पुस्तक आणि प्रशिक्षण पद्धती तयार करण्यात आल्या आहेत आणि त्यामध्ये वीसहून अधिक शिक्षक, टीच फॉर इंडियाचे फेलोज, विद्यार्थी आणि अधिकारी यांचं योगदान आहे.

**'हरित सेतू' ब्रँड डिझाइन स्पर्धा**

पिंपरी चिंचवड महापालिका आणि असोसिएशन ऑफ डिझायनर्स ऑफ इंडियाद्वारे सुरू असलेल्या 'हरित सेतू' ब्रँड डिझाइन स्पर्धेला देशभरातून चांगला प्रतिसाद मिळत असल्यानं स्पर्धेची अंतिम मुदत आता ३० जून २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. हरित सेतू या महत्त्वाकांक्षी उपक्रमाबाबत जनजागृती करण्यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. उत्तम पदपथ, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला प्रोत्साहन आणि पर्यावरणस्नेही नागरी रचना, हे या प्रकल्पाचं उद्दिष्ट आहे.

**निधी**

समाजात सुरू असलेल्या अनेक सेवाकार्यांमाध्ये स्वतःला जोडणं आणि त्या सेवाकार्यांना शक्य तेवढी मदत करणं, हे प्रत्येकाचं कर्तव्य आहे असं मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य सुहास हिरेमठ यांनी पुण्यात व्यक्त केलं. जनता सहकारी बँकेतील वरिष्ठ अधिकारी संजीव खळदकर यांनी आपल्या सेवानिवृत्तीनिमित्त

अकरा सेवाभावी संस्थांना अकरा लाख रुपयांचा निधी नुकताच प्रदान केला. खळदकर कुटुंबियांतर्फे आयोजित या ‘सामाजिक कृतज्ञता निधी प्रदान कार्यक्रमात हिरेमठ बोलत होते.

**बालगंधर्व - ‘मम सुखाची ठेव’**

संगीताचार्य पंडित द. वि. काणेबुवा प्रतिष्ठानतर्फे नटसम्राट बालगंधर्व यांच्या जयंतीनिमित्त त्यांनी गायलेल्या अजरामर नाट्यसंगीतावर आधारित ‘मम सुखाची ठेव’ या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचं आयोजन पुण्यात करण्यात आलं. नटसम्राट बालगंधर्व यांच्यासह संगीत नाटकात भूमिका केलेल्या ज्येष्ठ गायक-अभिनेत्री विदुषी निर्मला गोगटे यांनी पंडित काणेबुवा, भास्करबुवा बखले, बालगंधर्व आणि कवी कुलगुरू कालिदास यांच्या कार्याची महती विशद केली. बालगंधर्व हे केवळ सुरेल, नादमय अभिनेते-गायक नव्हते तर त्यांचं गाणं हृदयातून फुललेलं असे. रंगमंचावरील पदन्यास, केशभूषा, वेशभूषा याकडं बालगंधर्व यांचा विशेष कटाक्ष असे अशा आठवणी त्यांनी सांगितल्या. मंजुषा पाटील यांनी नाट्यसंगीत सादर केलं. या कार्यक्रमाला सांगीतिक क्षेत्रातील अनेक कलाकार उपस्थित होते.

**दंड**

एसटीच्या पुणे विभागानं विना तिकिट प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर कडक कारवाई करत ३ लाख ४० हजार रुपयांपेक्षा अधिक दंड वसूल केला आहे. पुणे विभागाच्या अंतर्गत असलेल्या १४ आगारांमधून एसटीनं केलेल्या तपासणी मोहिमेत ३१९ फुकट्या प्रवाशांवर ही कारवाई करण्यात आली आहे.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.